**परीक्षेचे नांव - बीड जिल्हा पोलीस पाटील पदभरती परीक्षा**

**परीक्षेचा दिनांक- 22 फेब्रुवारी 2026** **जाहीरात क्र. 01/2026**

दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित पोलीस पाटील पदभरती परीक्षा या परीक्षेची प्रथम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात आली होती. त्यांसदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण देऊन ईमेलवर व अर्जाव्दारे सादर केलेल्या हरकती, तसेच तज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन उत्तरतालिका अंतिम केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. खालील प्रश्न वगळता यापुर्वी दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी प्रसिध्द केलेली उत्तरतालिका अंतिम व कायम समजण्यात यावी.

**उत्तरतालिका - ANSWER KEY**

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 29 | A | B | # | A |
| 52 | B | D | B | # |
| 55 | # | B | C | C |
| 56 | B | # | C | C |

**# ने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले असून, त्या प्रश्नाबाबत सर्व उमेदवारांना पूर्ण गुण देण्यात येतील.**

(रद्द केलेला प्रश्न - {संच A- प्रश्न क्र.55, संच B- प्रश्न क्र.56, संच C- प्रश्न क्र.29 व संच D- प्रश्न क्र.52} एका पुरुषाकडे बोट दाखवून एक स्त्री म्हणाली, "तो माझ्या आईच्या भावाचा एकुलता एक मुलगा आहे." तर त्या स्त्रीचे त्या पुरुषाशी नाते काय?)

**दिनांक :** 24.02.2026




अध्यक्ष तथा
उपविभागीय अधिकारी
Sub Divisional Officer
Beed

Scanned with OKEN Scanner

उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड
( आस्थापना विभाग )
दुरध्वनी/फॅक्स:-02442-222458 EmailId:-beedsdo@gmail.com

परीक्षेचे नाव:- पोलीस पाटील पदभरती परीक्षा
परीक्षेचा दिनांक:-22 फेब्रवारी,2026 जाहिरात क्रमांक-01/2026

प्रश्नपत्रीकेवरील आक्षेपा बाबत स्पष्टीकरण

---

**आक्षेप क्र.01-**

श्रीमती प्रतिक्षा आदीनाथ गुंदेकर रा.आंबेसावळी ता.बीड यांचा आक्षेप-
श्री.पवन बाबासाहेब गुठे यांचा आक्षेप-
श्री.राजेंद्र भुजंग खोसे रा.गायकवाड जळगाव ता.गेवराई यांचा आक्षेप-
प्रश्न संच-B प्रश्न क्र.54 ,प्रश्न संच A-प्रश्न क्र.58 प्रश्न संच-C प्रश्न क्र.56
खालील विधानामधून अचूक विधान ओळखा

1) पोलीस पाटील गुन्हेगारांची माहिती पोलीसांना देतात.
2) पोलीस पाटील गुन्हेगारांना पकडुन ठाणे अधिकाऱ्याके पाठवतात

A)फक्त 1 बरोबर B)फक्त दोन बरोबर
C)1 व 2 बरोबर D)1 व 2 चुक

**अर्जदाराचे म्हणने**-दिलेले अधिकृत उत्तर-1 आणि 2 बरोबर असे दिले आहे,माझ्या मते फक्त-1 बरोबर आहे.
**स्पष्टीकरण- महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 मधील कलम 14 चे अवलोकन व्हावे,उत्तर तालीकेतील उत्तर पर्याय C)1 व 2 बरोबर हेच योग्य उत्तर आहे.**

**आक्षेप क्र.2-**

श्री.मुळीक श्रीहरी बाबुराव यांचा आक्षेप
प्रश्न संच-C) प्रश्न क्र.29,38,56,61
**अर्जदाराचे म्हणने**- प्रश्न क्र.29,38,56,61 मधील उत्तरे चुकीचे आहेत.
**स्पष्टीकरण:-** संबंधीत अर्जदार यांनी प्रश्नाची उत्तरे चुकीचे असल्या बाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा अर्जासोबत जोडलेला नाही.अर्ज मोघम स्वरुपाचा अहे.

**आक्षेप क्र.3-**

श्रीमती जाधव अमृता दतात्र रा.सिरसमार्ग ता.गेवराई यांचा आक्षेप-
प्रश्न संच-B प्रश्न क्र.44-बीड जिल्हयाचा प्रादेशिक परिवहन(RTO) वाहन नोंदणी क्रमांक कोणता आहे?
A)MH 23 B)MH44 C) A आणि B दोन्ही D)वरीलपैकी एकही नाही.
**अर्जदाराचे म्हणने-** बीडसाठी शासनाद्वारे दोन RTO वाहन नोंदणी क्रमांक मंजुर आहेत.त्यापैकी बीडसाठी MH 23 व अंबाजोगाईसाठी MH 44 असा आहे. प्रश्न हा बीड जिल्हयाचा RTO वाहन नोंदणी क्रमांक कोणता असा विचारल्याने पर्याय A) MH 23 हे उत्तर असणे अपेक्षीत आहे.परंतु उत्तरतालीकेत पर्याय C हे उत्तर सुधारीत करुन पर्याय A करावे मला त्या प्रश्नाचा गुण देण्यात यावा.
**स्पष्टीकरण:-** प्रश्नामध्ये बीड जिल्हाचा प्रादेशिक परिवहन(RTO) वाहन नोंदणी क्रमांक विचारलेला आहे व जिल्हयात MH 23 MH44 हे दोन्ही प्रादेशिक परिवहन(RTO) वाहन नोंदणी क्रमांक असल्याने पर्याय C- A आणि B दोन्ही हेच उत्तर बरोबर आहे.

Scanned with OKEN Scanner

**आक्षेप क्र.4-**

श्री.दामोधर राधाकिसन येवले रा.मानमोडी ता.गेवराई यांचा आक्षेप-

**अर्जदाराचे म्हणने:**-जाहीरामध्ये परीक्षेचा अभ्यासक्रम एसएससी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल यात सामान्य ज्ञान,गणित,पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य,बुध्दीमत्ता चाचणी,स्थानिक परिसराची माहिती,चालु घडामोडी विषयाचा समावेश आहे.त्यामध्ये मराठी व्याकरण या विषयाचा उल्लेख नाही.परंतु प्रश्न संच D प्रश्न क्र.5,10,21,30,36,60,66 मराठी व्याकरणाशी संबंधीत असल्याने सदरील प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे असल्याने रद्द करण्यात यावेत व त्याचे गुण सर्व उमेदवारांना देण्यात यावेत.

**स्पष्टीकरण:**-सामान्य ज्ञान या घटकामध्ये भाषा विषयाचा समावेश होत असल्याने व सदरील प्रश्न एसएससी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत आहेत.सदरील प्रश्न हे अभ्यासक्रमा बाहेरचे आहेत असे म्हणता येणार नाही.

**आक्षेप क्र.5-**

श्री.अलीम सत्तार सय्यद ता.गेवराई यांचा आक्षेप-

**अर्जदाराचे म्हणने:**-जाहीरामध्ये परीक्षेचा अभ्यासक्रम मराठी/इंग्रजी व्याकरण या विषयाचा उल्लेख नाही.परंतु प्रश्न संच B प्रश्न क्र.4,10,15,21,36,46,51 हे मराठी /इंग्रजी व्याकरणाशी संबंधीत असल्याने सदरील प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे असल्याने रद्द करण्यात यावेत व त्याचे गुण सर्व उमेदवारांना देण्यात यावेत.

**स्पष्टीकरण:**- सामान्य ज्ञान या घटकामध्ये भाषा विषयाचा समावेश होत असल्याने व सदरील प्रश्न एसएससी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत आहेत.सदरील प्रश्न हे अभ्यासक्रमा बाहेरचे आहेत असे म्हणता येणार नाही.

**आक्षेप क्र.6-**

श्री.अक्षय अनिरुध्द काकडे रा.जरुड ता.बीड यांचा आक्षेप-

श्री.कुलदीप बाबासाहेब मोरे रा.मसेवाडी ता.बीड यांचा आक्षेप-

श्री.ठाणगे विश्वजीत यांचा आक्षेप अर्ज-

प्रश्न संच क्रं.-D प्रश्न क्र.78, प्रश्न संच क्र.-A प्रश्न क्र.79-

महाराष्ट्राला एकुणकिती किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे.

A)720 B)680 C)700 D)840

**अर्जदाराचे म्हणने:**- नविन मोजनीनूसार महारष्ट्राच्या किनारपटटीची अधिकृत लांबी 877.97 किमी आहे.पर्यायामध्ये सदर उत्तर नसल्याने प्रश्न रद्द करण्यात यावा.

**स्पष्टीकरण:**-Press information Bureau,Gov.of Maharastra State DisasterManagement Authority,Sagarmala-Ministry of Shiping,GOI,Government of India,Directorate of Town Plannig and Valuation Maharastra State यांच्या संकेत स्थळावरील मुख्यपृष्ठाचे अवलोकन व्हावे.उत्तर A)720 हेच योग्य उत्तर आहे.

दिनांक-24.02.2026

SUB DIVISIONAL OFFICER BEED.

(कविता जाधव)

उपविभागीय दंडाधिकारी, बीड तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती -2026

Sub Divisional Officer
Beed.

Scanned with OKEN Scanner